नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प

डॉ पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला आणि भारत मौसम विभाग

ईमेल - mahapocra@gmail.com, gkmsakola@yahoo.com

अमरावती जिल्हा कृषि हवामान सल्ला मंगळवार, दिनांक - ०९.०७.२०१९

| हवामान घटक | हवामान अंदाज (दिनांक: १०/०७/२०१९ ते १४/०७/२०१९) | | | | |
|---|---|---|---|---|---|
| दिनांक | १०/०७ | ११/०७ | १२/०७ | १३/०७ | १४/०७ |
| पाऊस (मिमी) | १० | ४ | ३ | २ | ३ |
| कमाल तापमान (अं.से.) | ३२ | ३२ | ३३ | ३३ | ३२ |
| किमान तापमान (अं.से.) | २३ | २४ | २३ | २३ | २४ |
| ढग स्थिती | पूर्णतः ढगाळ | पूर्णतः ढगाळ | पूर्णतः ढगाळ | पूर्णतः ढगाळ | पूर्णतः ढगाळ |
| सकाळची सापेक्ष आद्रता (%) | ८५ | ८३ | ८० | ८५ | ९० |
| दुपारची सापेक्ष आद्रता (%) | ६५ | ६७ | ६५ | ६० | ५८ |
| वाऱ्याचा वेग (किमी/तास) | ४ | ५ | ५ | ५ | ४ |
| वाऱ्याची दिशा | २६० | २६३ | २५४ | २५५ | २५० |

| हवामानाचा इशारा | | पुढील २ दिवस जिल्ह्यात हलका स्वरूपाचा पाऊस पडण्याची शक्यता आहे. |
|---|---|---|
| पिकाचे नाव | अवस्था | कृषी सल्ला |
| सर्व पिके | - | जिल्ह्यात बऱ्याच ठिकाणी मागील दोन दिवसात चांगला पेरणी योग्य पाऊस पडला आहे तेथे पेरणी या आठवड्यात आटपावी पिक व पिक वाण निवडतांना शक्यतोवर कमी कालावधीची पिके घावी. पेरणी करताना बियाण्याचे हेक्टरी प्रमाण २० टक्केनी वाढवावे. वेळेवर पेरणी केलेल्या पिकास जसे सोयाबीन, कपाशी, मका तेलबिया पिके व इतर कडधान्य पिकांमध्ये अशा प्रकारच्या पिकात उगवण पश्चात तण नाशकांचा तांत्रिक सल्ला घेऊनच तण नाशकांची फवारणी करावी. तणनाशक फवारण्याची योग्य वेळ, पिकांची व तणांची अवस्था, तणनाशक व पाण्याचे प्रमाण इत्यादी बाबींचा विचार करूनच तणनाशकांचा वापर करावा. |
| कपाशी | पेरणी | कपाशीचे एकेए-५, एकेए-७, एकेए-८ या सरळ सुधारित वाणांसाठी बियाण्याचे हेक्टरी प्रमाण १२ ते १५ किलो वापरावे व मध्यम व भारी जमिनीत लागवड करिता ६०× १५ से.मी अंतरठेवावे व अमेरिकन सुधारित जातीमध्ये एकेएच-०८१, पीकेव्ही-रजत, एकेएच-९९१६हे वाण वापरावेत व लागवड अंतर मध्यम व भारी जमिनी करिता अनुक्रमे ६० × १५ से.मी व ६० × ३० से. मी ठेवावे.यासाठी बियाण्याचे हेक्टरी प्रमाण १० ते १२ किलो वापरावे. देशी संकरीत जात पीकेव्ही-डीएच-१ वाणासाठी लागवड अंतर ६० × ४५ सेमी ठेवावे व बियाण्याचे हेक्टरी प्रमाण ३.० ते ३.५ किलो वापरावे. बीटी कपाशीचे योग्य व लवकर येणारे वाण वापरावे. मुलस्थानी जल संधरणासाठी सरी किंवा रुंद-वरंबा सरी पद्धतीचा अवलंब करावा. वेळेवर पेरणी केलेल्या पिकास आंतरमशागत म्हणून हलकी डवरणी करावी. कपाशी या पिकामध्ये पायरीथीओबॅक सोडीअम १० % इ.सी. (१२.५ ते १५ मिली प्रती १० लिटर पाणी) या उगवण पश्चात तण नाशकाची उभ्या पिकात पिक २०-३० दिवसांचे असतांना फवारणी करावी. गवतवर्गीय तणांचा जास्त प्रादुर्भाव असल्यास क्विझालोफॉप ईथाइल ५ % इ,.सी. (२० मिली प्रती १० लिटर पाणी) या तणनाशकाची उभ्या पिकात १५-२० दिवसांनी फवारणी करावी. |
| सोयबीन | पेरणी | सोयाबीनच्या पेरणीसाठी जेएस ९३-०५, जेएस-९५-६०, जेएस-२०-२९, जेएस-२०-३४, एमएयुएस-७१, एमएयुएस-१५८, एमएयुएस-६१२, एमएयुएस-१६२, डीएस-२२८ हे वाण वापरावे. यासाठी बियाण्याचे प्रमाण ७५ किलो/हेक्टरी वापरावे. सोयाबीन पिकामध्ये नत्र स्थिर करण्यासाठी, स्फुरद उपलब्ध होण्यासाठी व मातीतील बुरशीजन्य रोगांपासून बचावासाठी रायझोबियम व पीएसबी |

| | | |
|---|---|---|
| | | जीवाणुसंवर्धक २५ ग्रॅम व ट्रायकोडर्मा ५ ग्रॅम प्रति किलो बियाण्यास बीजप्रक्रिया करावी. वेळेवर पेरणी केलेल्या सोयाबीन पिकास आंतरमशागत म्हणून हलकी डवरणी करावी. तसेच पिकात ईमॅझीथायपर १०% एस एल (१५-२० मिली प्रती १० लिटर पाणी ) किंवा ईमॅझीथायपर + इमॅझोमॅक्स ७० डब्लू.जी. (१०० ग्रम प्रती हेक्टर ) किंवा प्रोपॅक्विझाफोप २.५ % + ईमाझीथायपर ३.७५% (४० मिलि प्रती १० लिटर पाणी) या उगवणपश्चात तणनाशकाची पिक १५-२० दिवसांचे असतांना किंवा तण २-३ पानांच्या अवस्थेत असतांना फवारणी करावी. गवतवर्गीय तणांचा जास्त प्रादुर्भाव असल्यास सोयाबीन या पिकात क्विझालोफॉप इथाइल ५ % इ,.सी. (२० मिली प्रती १० लिटर पाणी) किंवा प्रोपॅक्विझाफोप १०% इ,.सी. (१५ मिली प्रती १० लिटर पाणी) यापैकी एका तणनाशकाची उभ्या पिकात १५-२० दिवसांनी फवारणी करावी. |
| तूर | पेरणी | तूर पिका करीता पिकेव्ही तारा, बीएसएमआर - ७३६, ८५३, AKPHM -११३०३(संकरीत), AKT-८८११ (सुधारित वाण) या वाणांची निवड करावी व बियाण्याचे हेक्टरी प्रमाण १२ ते १५ किलो वापरावे व लागवड अंतर ६० × ३० सेमी ठेवावे. पेरणीपुर्वी बियाण्यास रायझोबियम २५ ग्रॅम/किलो, पीएसबी २५ ग्रॅम/किलो, ट्रायकोडर्मा ४ ग्रॅम/किलो, थायरम + कार्बेन्डॅझिम २+१ ग्रॅम/किलो या प्रमाणात बीज प्रक्रिया करावी. वेळेवर पेरणी केलेल्या पिकास आंतरमशागत म्हणून हलकी डवरणी करावी. |
| मुग / उडीद | पेरणी | शिफारसी नुसार ७ जुलै नंतर सलग मुग व सलग उडीद पिकाची पेरणी करू नये, कारण उशिरा पेरणी केल्याने उत्पनात खूप घट येते. त्यानंतर करावयची असल्यास आंतरपीक म्हणून त्याचा समावेश करावा. मुग पिका करीता एकेएम-१२१८, पीकेव्ही एकेएम-४, पिकेव्ही-ग्रीन गोल्ड, पिकेव्ही- ८८०२ आणि उडीद पिकाकरीता एकेयु -१५ , टीएयु -१, टीएयु -२, पिडीकेव्ही- ब्लॅक गोल्ड. पेरणीपुर्वी बियाण्यास रायझोबियम २५ ग्रॅम/किलो, पीएसबी २५ ग्रॅम/किलो, ट्रायकोडर्मा ४ ग्रॅम/किलो, थायरम + कार्बेन्डॅझिम २+१ ग्रॅम/किलो या प्रमाणात बीज प्रक्रिया करावी. वेळेवर पेरणी केलेल्या पिकास आंतरमशागत म्हणून हलकी डवरणी करावी. उडीद या पिकात क्विझालोफॉप ईथाइल ५ % इ.सी. (२० मिली प्रती १० लिटर पाणी) किंवा प्रोपॅक्विझाफोप १०% इ,.सी. (१५ मिली प्रती १० लिटर पाणी) यापैकी एका तणनाशकाची उभ्या पिकात १५-२० दिवसांनी फवारणी करावी. |
| ज्वारी | पेरणी | शिफारसी नुसार ज्वारीची पेरणी १० जुलै पर्यंत आटपावी त्यासाठी लवकर येणारे वाण सीएसएच-३०, मध्यम कालावधीचे वाण सीएसएच-३५, एसपीएच-१६३५, सुधारित जातीमध्ये पीडीकेव्ही कल्याणी, सीएसव्ही-२०, सीएसव्ही-२७, सीएसव्ही-३४ वापरावे. वेळेवर पेरणी केलेल्या पिकास आंतरमशागत म्हणून हलकी डवरणी करावी. |
| मका | पेरणी | वेळेवर पेरणी केलेल्या पिकास आंतरमशागत म्हणून हलकी डवरणी करावी. |
| फळझाडे | लागवड | पुढील २ दिवस जिल्ह्यात हलका स्वरूपाचा पाऊस पडण्याची शक्यता आहे तसेच मागील दोन दिवसात ज्या ठिकाणी पावसाने दमदार हजेरी लावली आहे तेथे शेतकरी बंधूनी फळझाडे लावण्यास सुरवात करावी, |
| भाजी पाला | लागवड | खरीप भाजीपाला पिकाचे रोपे तयार करण्यासाठी गादी वाफ्यावर बियाणे पेरावे. निशिगंध या फूल पिकांची लागवड करावी . |
| पशु व पक्षी | | पावसाळ्यात शेळ्या-मेंढ्यांना कोवळा हिरवा चारा खाल्ल्याने पोटात जंतूंची वाढ होते व विष तयार होऊन विषबाधा होते ते टाळण्यासाठी आंत्रविषार रोगाच्या लसीच्या १५ दिवसांच्या अंतराने दोन मात्रा टोचून घ्याव्यात. |

सदर कृषि हवामान सल्ला पत्रिका डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला येथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीवरून तयार करण्यात आली असून नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प कार्यालय मुंबई येथून प्रसारित करण्यात आलेली आहे.